अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील सहसंचालक, गट - अ संवर्गाची दिनांक ०१/०१/२०२२ (दिनांक ०१/०१/२०२१ ते दिनांक ३१/१२/२०२१) रोजीची अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## नियोज़न विभाग

शासन परिपत्रक क्रमांक: ज्येष्ठसू-१०२४/प्र.क्र.०४/का.१४२७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- ०९.०१.२०२४

संदर्भ :- (१) सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.२८१/बारा, दिनांक २१ जून, २०२१.
(२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही २०१६/प्र.क्र.२८१का.१२, दिनांक १३/०७/२०२१.
(३) नियोजन विभाग, परिपत्रक क्र.ज्येष्ठसू-१०२३/प्र.क्र.७०/का.१४२७, दिनांक १०/१०/२०२३.
(४) नियोजन विभाग, परिपत्रक क्र.ज्येष्ठसू-१०२३/प्र.क्र.७१/का.१४२७, दिनांक १०/१०/२०२३.

**शासन परिपत्रक :-**

अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील सहसंचालक, गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांची दिनांक ०१/०१/२०२१ (दिनांक १/१/२०२० ते दिनांक ३१/१२/२०२० या कालावधीची) रोजीची अंतिम ज़्येष्ठतासूची उपरोक्त संदर्भ क्रमांक ३ येथील परिपत्रकाव्दारे प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर संवर्गाची दिनांक १/०१/२०२२ रोजीची (दिनांक ०१/०१/२०२१ ते दिनांक ३१/१२/२०२१ या कालावधीची) तात्पुरती ज्येष्ठतासूची संदर्भाधीन क्रमांक ४ येथील परिपत्रकाव्दारे प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर तात्पुरत्या ज्येष्ठतासूची संदर्भात प्राप्त आक्षेप विचारात घेऊन, सहसंचालक, गट-अ संवर्गातील कार्यरत अधिकाऱ्यांची दिनांक ०१/०१/२०२२ रोजीची (दिनांक १/१/२०२१ ते दिनांक ३१/१२/२०२१ या कालावधीची) अंतिम ज्येष्ठतासूची या परिपत्रकासोबत जोडलेल्या परिशिष्ट - अ नुसार प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर ज्येष्ठतासूची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता मिळण्याच्या अधिन राहून प्रसिध्द करण्यात येत आहे.

२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ मध्ये दिनांक ०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सामान्य प्रशासन विभागाने त्यांच्या पत्र क्र. बीसीसी-२०१७/ प्र.क्र.३१२A/१६-ब, दिनांक २९/१२/२०१७ च्या पत्रान्वये विधी व न्याय विभागाच्या सहमतीने पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च

न्यायालयात दाखल विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यात यावीत, अशा सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर सूचना विचारात घेऊन सहसंचालक, गट-अ संवर्गातील पदोन्नती कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदांवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आलेली आहे. त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयानंतर सहसंचालक, गट-अ यांच्या सदर ज्येष्ठतासूचीत सुधारणा होऊ शकते.

३. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांनी हे परिपत्रक व सोबतची अंतिम ज्येष्ठतासूचीची प्रत संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेऊन सहसंचालक, गट-अ संवर्गातील संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणावी व तसे कळविल्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांची स्वाक्षरी घेतलेली प्रत अभिलेख्यावर ठेवावी.

४. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सदर शासन परिपत्रक उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०२४०१०९१५२४०४१०१६ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

BALASO BABURAO GAIKWAD

Digitally signed by BALASO BABURAO GAIKWAD
DN: CN = BALASO BABURAO GAIKWAD, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = PLANNING DEPARTMENT
Date: 2024.01.09 15:23:54 +05'30'

(बा. बा. गायकवाड)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत :- परिशिष्ट- अ

प्रत :-

(१) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

- यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक सोबतच्या परिशिष्ट-अ सह अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावे.

(२) निवडनस्ती.

नियोजन विभाग, शासन परिपत्रक क्र.ज्येष्ठसू-१०२४/प्र.क्र.०४/का.१४२७, दिनांक ९ जानेवारी, २०२४ सोबतचे परिशिष्ट-अ

अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या सहसंचालक, गट-अ संवर्गाची दिनांक १/१/२०२२ रोजीची अंतिम ज्येष्ठतासूची (दिनांक १/१/२०२१ ते दिनांक ३१/१२/२०२१ या कालावधीची)

| नियम ३ (२)(ब) नुसार ज्येष्ठता क्रमांक | शासकीय कर्मचाऱ्याचे नांव | नियुक्तीचा मार्ग | जन्म दिनांक | प्रवर्ग | नियम ३ (२)(अ) संवर्गात प्रत्यक्ष रुजू दिनांक | ज्येष्ठतेचा दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | श्री.दि.स.राजूरकर | ना | ०९-०४-६७ | खुला | २९-१२-१२ | २९-१२-१२ | ३०-०४-२५ | |
| २ | श्री.ध.गं.सुटे | प | १७/११/१९६६ | अजा | ०६-०४-१६ | ०१-११-१३ | ३०-११-२४ | |
| ३ | श्रीमती सु.सु.अय्यर | प | २०/०४/१९६३ | खुला | ०५-०७-१६ | ०१-०४-१४ | ३०-०४-२१ | सेवानिवृत्त ३०/४/२१ |
| ४ | श्री.पु.हि.भगुरकर | ना | ३०/०८/१९६५ | खुला | ३१-१२-१४ | ३१-१२-१४ | ३१-०८-२३ | |
| ५ | श्री.धु.तु.राठोड | प | ०१-०६-६३ | विजा अ | १०-०१-१९ | ०१-०८-१५ | ३१-०५-२१ | सेवानिवृत्त ३१/५/२१ |
| ६ | श्री.सं.ल.पाटील | प | ०१-०६-६५ | खुला | ०८-०७-१६ | ०१-०९-१५ | ३१-०५-२३ | |
| ७ | श्री.कि.भ.जोशी | प | २४/०४/१९६६ | खुला | ०२-०७-१६ | ०१-१०-१५ | ३०-०४-२४ | |
| ८ | श्री.प्र.मो.पोहरे | प | १४/०१/१९६६ | खुला | १४-०७-१६ | ०९-११-१५ | ३१-०१-२४ | |
| ९ | श्री.प्र.श्रा.डायरे | प | ०१-०७-६३ | भज ब | २३-०५-१६ | ०१-०१-१६ | ३०-०६-२१ | सेवानिवृत्त ३०/६/२१ |
| १० | श्री.रा.ने.तितर | प | ३०/११/१९६६ | भज क | ०१-०७-१६ | ०१-०७-१६ | ३०-११-२४ | |
| ११ | श्री.प्र.नि.पोतदार | प | ०५-०६-६५ | इमाव | ०५-०७-१८ | ०१-०९-१६ | ३०-०६-२३ | |
| १२ | श्री.र.वि.जगताप | प | ०१-०६-६४ | इमाव | ०४-०७-१८ | २३-०३-१७ | ३१-०५-२२ | |
| १३ | श्री.कृ.व.फिरके | प | ०१-१०-६९ | इमाव | ०४-०७-१८ | ०१-०४-१७ | ३०-०९-२७ | |
| १४ | श्री. दि.हि.वाघ | प | ०२-०५-७१ | दिव्यांग - क) अस्थिव्यंग/ इमाव | १५-०९-१८ | ०१-०९-१७ | ३१-०५-२९ | |
| १५ | श्रीमती ऋ. दि. आडिवरेकर | प | १७-१२-७३ | इमाव | ०७-०८-१९ | ०१-०९-१७ | ३१-१२-३१ | |
| १६ | श्री. म. का. भांगे | प | ०५-०८-६८ | भज ड | ०१-०८-१९ | ०१-०९-१७ | ३१-०८-२६ | |
| १७ | श्रीमती रु.ज.पाटील | प | १६-०७-६७ | खुला | ०८-११-१९ | १७-०२-१८ | ३१-०७-२५ | |
| १८ | श्री. सु. ना. गवळी | ना | १०-०५-६९ | इमाव | ०५-०६-१९ | ०५-०६-१९ | ३१-०५-२७ | |
| १९ | श्री.सं.भ.कोलगणे | प | ०८-०२-६७ | दिव्यांग - क) अस्थिव्यंग/ अज | १७-०९-२१ | १७-०९-२१ | २८-०२-२५ | |
| २० | श्री.ह.ल.माळी | प | ०१-०१-६७ | इमाव | १३-१०-२१ | १७-०९-२१ | ३१-१२-२४ | |

| नियम ३ (२)(ब) नुसार ज्येष्ठता क्रमांक | शासकीय कर्मचाऱ्याचे नांव | नियुक्तीचा मार्ग | जन्म दिनांक | प्रवर्ग | नियम ३ (२)(अ) संवर्गात प्रत्यक्ष रुजू दिनांक | ज्येष्ठतेचा दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| २१ | श्री.अ.अ.खंडारे | प | ०५-११-७३ | खुला | १३-१०-२१ | १७-०९-२१ | ३०-११-३१ | |
| २२ | श्री.कि.प्र.गिरगांवकर | प | ०८-०७-६६ | खुला | २९-११-२१ | १७-०९-२१ | ३१-०७-२४ | |
| २३ | श्री.भ.ज.जगदाळे | प | ११-०५-६७ | खुला | ०१-११-२१ | १७-०९-२१ | ३१-०५-२५ | |
| २४ | श्रीमती स.मि.मु-हेकर (श्रीमती स.सु.भालेराव) | प | २५-०८-६७ | खुला | १७-०९-२१ | १७-०९-२१ | ३१-०८-२५ | |
| २५ | श्रीमती रु.प्र.थोते (श्रीमती रु.श.भुसारी) | प | १०-०४-७४ | खुला | १७-०९-२१ | १७-०९-२१ | ३०-०४-३२ | |
| २६ | श्री.प्र.रा.केंभावी | प | ०४-०२-७४ | खुला | ०७-१०-२१ | १७-०९-२१ | २९-०२-३२ | |
| २७ | श्री.ज्ञा.व.आंबेकर | प | १२-०९-६५ | इमाव | १६-०१-२३ | १७-०९-२१ | ३०-०९-२३ | |
| २८ | श्रीमती उ.ग.नाईक (श्रीमती उ.व.आंबेव्हाळकर) | प | २९-०३-७५ | खुला | १७-०९-२१ | १७-०९-२१ | ३१-०३-३३ | |
| २९ | श्रीमती सि.प्र.जोशी | प | २२-०९-६७ | खुला | ११-१०-२१ | ११-१०-२१ | ३०-०९-२५ | |

- ना - नामनिर्देशन
- प - पदोन्नती

BALASO BABURAO GAIKWAD

Digitally signed by BALASO BABURAO GAIKWAD
DN: CN = BALASO BABURAO GAIKWAD, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = PLANNING DEPARTMENT
Date: 2024.01.09 15:24:12 +05'30'

अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील "सहसंचालक, गट -अ" संवर्गाची दिनांक ०१/०१/२०२२ व दिनांक ०१/०१/२०२३ रोजीच्या अंतिम ज्येष्ठतासूचीमध्ये श्री. विकास व. कुलकर्णी यांचा समावेश करण्याबाबत.......

**महाराष्ट्र शासन**

**नियोजन विभाग**

**शासन शुध्दीपत्रक क्रमांक: ज्येष्ठसू-१०२४/प्र.क्र. ०४/का.१४२७**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : -१७/०२/२०२६.

<u>वाचा</u> :- १) नियोजन विभाग, शासन परिपत्रक क्र. ज्येष्ठसू-१०२४/प्र. क्र. ०४/का.१४२७, दिनांक ०९/०१/२०२४.

२) नियोजन विभाग, शासन आदेश क्र. पदोनि-११२१/प्र.क्र.४०/का.१४२७, दि.१४/०९/२०२१

३) नियोजन विभाग, शासन आदेश इएसटी-१०२४/प्र.क्र.२५/का.१४२७, दिनांक ११/०३/२०२४

४) नियोजन विभाग, शासन परिपत्रक क्र. ज्येष्ठसू-१०२५/प्र. क्र. ५४/का.१४२७, दिनांक ०७/०७/२०२५.

**<u>शासन शुध्दीपत्रक</u>**

अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील "सहसंचालक, गट -अ"संवर्गाची दिनांक ०१/०१/२०२२ (दिनांक १/०१/२०२१ ते दिनांक ३१/१२/२०२१ या कालावधीची) अंतिम ज्येष्ठतासूची संदर्भ क्र.१ च्या शासन परिपत्रकासोबत जोडलेल्या "परिशिष्ट-अ" नुसार प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. संदर्भ क्र. २ च्या शासन आदेशान्वये श्री. विकास व. कुलकर्णी, उपसंचालक, मा.राज्यपालांचे सचिव कार्यालय, राजभवन, मुंबई यांना सहसंचालक, गट-अ संवर्गात पदोन्नती देऊन त्यांची पदस्थापना सहसंचालक (मूल्यमापन), अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई या पदावर करण्यात आली. तथापि, श्री. कुलकर्णी यांना पदोन्नतीच्या पदावर रुजू होण्याकरिता मा. राज्यपालांचे सचिव कार्यालयाकडून कार्यमुक्त केले नसल्याने ते पदोन्नतीच्या पदावर विहित मुदतीत रुजू होऊ शकले नाहीत.

परंतु सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने राजभवन सचिवालयातील वैधानिक विकास मंडळ शाखेतील उपसंचालक पद श्रेणी उन्नत करुन श्री. कुलकर्णी यांची पदस्थापना सहसंचालक, विकास मंडळ, मा. राज्यपालांचे सचिव कार्यालय, राजभवन, मुंबई या पदावर करण्यात आली आहे. त्यानुसार श्री. कुलकर्णी संदर्भ क्र. ३ अन्वये राज्यपालांच्या सचिव कार्यालयात सहसंचालक (विकास मंडळे) या श्रेणी उन्नत पदावर दिनांक १२/०३/२०२४ पासून रुजू झाले आहेत. त्यामुळे त्यांचा समावेश दिनांक ०१/०१/२०२५ च्या तात्पुरत्या ज्येष्ठतासूचीत

करण्यात आला आहे. सदर दिनांक ०१/०१/२०२५ ज्येष्ठतासूची संदर्भात श्री.विकास व. कुलकर्णी यांनी उपस्थित केलेले आक्षेप विचारात घेऊन ते पदोन्नतीच्या पदावर रुजू होण्यासाठी झालेला विलंबाकरिता स्वत:जबाबदार नसून प्रशासकीय कारणास्तव विलंबाने रुजू झाले आहेत.

त्यामुळे श्री. कुलकर्णी यांचा "सहसंचालक, गट -अ"संवर्गाची दिनांक ०१/०१/२०२२ (दिनांक १/०१/२०२१ ते दिनांक ३१/१२/२०२१ या कालावधीची) व दिनांक ०१/०१/२०२३ (दिनांक १/०१/२०२२ ते दिनांक ३१/१२/२०२२ या कालावधीची) च्या अंतिम ज्येष्ठतासुचीत समावेश करणे आवश्यक आहे. त्यानुसार "सहसंचालक, गट -अ"संवर्गाची दिनांक ०१/०१/२०२२ व दिनांक ०१/०१/२०२३ रोजीच्या अंतिम ज्येष्ठतासूचीमध्ये श्री. विकास व. कुलकर्णी यांचा ज्येष्ठता क्रमांक खालील विवरणपत्रामध्ये (स्तंभ क्र. १ ते ४ मध्ये) दर्शविल्याप्रमाणे राहील.

| सहसंचालक - गट-अ- श्री. विकास व. कुलकर्णी | | | |
|---|---|---|---|
| ज्येष्ठता दिनांक (मानीव दिनांक)-१७/०९/२०२१ | | | |
| ज्येष्ठता सूची वर्ष | अनुक्रमांक | ज्येष्ठता यादीतील क्रमानंतर | ज्येष्ठता यादीतील क्रमापूर्वी |
| १ | २ | ३ | ४ |
| २०२२ | १८ अ | श्री. सु. ना. गवळी यांच्या नंतर | श्री. सं. भ. कोलगणे यांच्या पूर्वी |
| २०२३ | १५ अ | | |

३. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०२६०२१७१०४८५१०८१६ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

LATIKA VIVEK PATIL

Digitally signed by LATIKA VIVEK PATIL
DN: CN = LATIKA VIVEK PATIL, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = PLANNING DEPARTMENT
Date: 2026.02.17 10:54:08 +05'30'

(लतिका वि. पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :- (१) आयुक्त, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई - यांना विनंती करण्यात येते की, सदर शुध्दीपत्रक अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावे.

(२) निवडनस्ती.